<u>प्रेसनोट</u> : तारीख १२.०४.२०१९

**मार्केटयार्ड पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**पाच वर्षापासूनच्या प्रेमाचा गोड शेवट पोलीस स्टेशन मध्ये...**

---

मार्केटयार्ड पोलीस स्टेशन,पुणे शहर हददीत गंगाधाम परिसरात राहणारी मुलगी व शनिवारपेठ मध्ये राहणारा मुलगा यांची सुमारे पांच वर्षापूर्वी ओळख झाली, ओळखीचे रुपांतर प्रेमात व प्रेमाचे रुन्पातर लग्नात झाले. परंतू या जोडप्याने लग्न करुन, थोडे दिवसांनी घरच्यांना सांगू म्हणून ते एकमेकांचे घरी राहात होते.

काल रोजी मुलगा नामे हिरेन प्रेमजी सतरा हा त्याचे पत्नीचे घरच्यांना समजावून, पत्नीस घेणेसाठी तिचे घरी गेला असता, तिथे वाद झाल्याने ते सर्वजण मार्केटयार्ड पोलीस स्टेशन,पुणे शहर येथे आले. त्यावेळी मुलगा व मुलीचे सर्व कागदपत्रे पाहून ते कायदेशीर असल्याचे व दोघांची वय बसत असल्याचे लक्षात आलेनंतर पोलीसांनी दोन्ही कडील लोकांना एकत्र बसवून, समुपदेशन केले. या पोलीसांच्या प्रयत्नाला यश येवून दोन्ही घरच्यांनी या लग्नास मंजूरी दिली. या नवदांपत्यांस पोलीसांनी पेढे देवून, दोघांना भावी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.